## वाल्मीक कराडला तुरुंगात मारहाण

**बीड ।** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा आणि खंडणीचा आरोप असलेला वाल्मिक कराड याला तुरूंगात मारहाण झाल्याचे समोर आले आहे. मकोका कायद्याअंतर्गत आरोपी असलेला वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले हे दोघे सध्या बीडच्या कारागृहात कैद आहेत. तसेच संतोष देशमुख हत्याकांडातील इतर आरोपीही त्याच तुरूंगात आहेत. तर बाजूच्या, दुसऱ्या बॅरेकमध्ये अक्षय आठवले नावाचा आरोपी असून तोही मकोका कायद्याअंतर्गत शिक्षा भोगत आहे. तर महादेव गीते हा परळीतील आणखी एक आरोपी आहे.

# देशदूत

शिल्पकार विकासाचा...






इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक १६१ । मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### व्यापक जाणिवेचा अभाव

देशात कर्करोगाचे रुग्ण वेगाने वाढत असल्याची आकडेवारी आरोग्य राज्यमंत्र्यांनी लोकसभेत दिली. २०१५ ते २०२५ या काळात देशात कर्करोग रुग्णांची संख्या सुमारे साडेपाच लाखांनी वाढली. यात भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर तर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. केवळ कॅन्सरच नव्हे तर माणसाने एकूणच त्याच्या वैयक्तिक आरोग्याविषयी काळजी करावी असेच निष्कर्ष विविध आरोग्य सर्वेक्षणे सतत नोंदवतात. उत्साहाने आणि ऊर्जेने भरलेले सळसळते वय, अशा शब्दात तरुण वयाचे वर्णन केले जाते. तथापि बहुसंख्य युवांना त्याच वयात दीर्घ व्याधी गाठतात. हृदयविकार, कर्करोग, रक्तदाब अशा विकारांचा त्यात समावेश आढळतो. अनेक जण दुर्दैवाने त्यात जीवनाची लढाई हरतात. अशी घटना घडली की त्याचे वर्णन 'त्यांना मृत्यूने अकाली गाठले', असे केले जाते. मृत्यू दुर्दैवी खराच, पण बेताल दिनचर्या आणि अयोग्य आहार-विहार अनारोग्याला अकाली आमंत्रण देणारे ठरत असावेत का? वैद्यकीय तज्ज्ञांचे त्यावर एकमत होऊ शकेल. माणसाने बैठी जीवनशैली आत्मसात केली पण तिच्या बरोबरीने आरोग्य ही कष्टाने कमावण्याची गोष्ट आहे ही जाणीव मात्र अभावानेच रुजलेली आढळते. व्यायाम करण्यासाठी पान २ वर »

# मोदींचा वारसा; संस्कृतीचा आरसा!

## राऊतांच्या खोचक टीकेला फडणवीसांचे संयमी प्रत्युत्तर

२०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा सरकारमध्ये ७५+च्या नेत्यांना सक्रिय राजकारणातून बाजुला करण्याचे तंत्र अवलंबले आहे. याचा फटका लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, व्यंकय्या नायडू, थावरचंद गेहलोत यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना बसला आहे. आता १२ वर्षानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील वयाचे ७५ वर्ष पार करणार असल्याने त्यांनीच सुरु केलेल्या अघोषित नियमानुसार ते निवृत्त होतील? अशी अपेक्षा विरोधकांना आहे. म्हणूनच मोदींचा वारसदार शोधण्याचा जावाईशोध राऊतांनी आज सकाळी पत्रकार परिषदेत लावला. त्यानंतर सुरु झालेल्या चर्चेला मुख्यमंत्री फडणवीसांनी संयमी उत्तर दिले.



**नागपूर ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी गुढीपाडव्यानिमित्त नागपुरातील संघ कार्यालयात पोहोचले होते. येथे त्यांनी संघाचे संस्थापक तथा पहिले सरसंघचालक डॉक्टर हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांना आदरांजली अर्पण केली. यानंतर ते संघाच्या कार्यक्रमातही सहभागी झाले होते. त्यांच्या या दौऱ्यासंदर्भात राजकीय वर्तुळात बरीच चर्चा रंगत आहे. यातच, शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी पतंप्रधान नरेंद्र मोदी यांचा वारसदार संघ ठरवेल आणि तो महाराष्ट्रातून असेल, असे विधान केले होते. यानंतर, भारतीय संस्कृतीत वडील जिवंत असताना मुलांचा विचार होत नाही आणि करायचाही नसतो. ही सर्व मुघली संस्कृती आहे की, वडिल जिवंत असताना मुले अशा प्रकारचा विचार करतात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मोदीजी यांचा उत्तराधिकारी शोधण्याचे कुठलेही कारण नाही. मोदीजी आमचे नेते आहेत. आणखी बरेच वर्ष मोदीजी काम करणार आहेत. आमचा आग्रह आहे. आम्ही २०२९ चे पंतप्रधान म्हणून मोदीजींकडेच बघत आहोत. संपूर्ण देश बघतो आहे. त्यामुळे आता अशी चर्चा करणे योग्य होणार नाही. भारतीय संस्कृतीत वडील जिवंत असताना मुलांचा विचार होत नाही आणि करायचाही नसतो. ही सर्व मुघली संस्कृती आहे की, वडिल जिवंत असताना मुले अशा प्रकारचा विचार करतात. त्यामुळे अत्ता कुणाचाही, कुठेही उत्तराधिकारी निवडण्याची वेळही आलेली नाही. तसा प्रश्नही नाही.असे म्हणत त्यांनी राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे.

एका पत्रकार परिषदेदरम्यान, मोदींचे वारसदार कोण असतील? असा प्रश्न संजय राऊतांना विचारण्यात आला होता. यावर ते म्हणाले होते, यासंदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निर्णय घेईल, असे दिसते. यावर, मोठ्या प्रमाणावर रस्सीखेच बघायला मिळेल? असा प्रश्न केला असता राऊत म्हणाले होते, यामुळेच मोदींना काल बोलाऊन त्यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. तसेच, संघाची चर्चा ही बंद दाराआड असते आणि ती बंद दाराआडची चर्चा शक्यतो बाहेर येत नाही. तरीही काही संकेत जे असतात, ते स्पष्ट आहेत. पुढचा नेता संघ ठरवेल आणि तो बहुतेक महाराष्ट्रातला असेल. असे राऊत म्हणाले होते.

## निधी तिवारी पंतप्रधान मोदींच्या खासगी सचिव



**नवी दिल्ली ।** २०१४ च्या बॅचच्या भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी निधी तिवारी यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खासगी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्ती विषयक मंत्रिमंडळ समितीने या नियुक्तीला मान्यता दिली. यापूर्वी निधी तिवारी पीएमओमध्ये उपसचिव म्हणून कार्यरत होत्या. त्यांना परराष्ट्र मंत्रालयात काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. या नवीन जबाबदारीसह, त्या पंतप्रधानांना त्यांच्या प्रशासकीय कामात मदत करतील आणि त्यांच्या जबाबदाऱ्या सुरळीत पार पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील.

## माजी केंद्रीय मंत्री भाजल्याने जखमी



**जयपूर ।** काँग्रेसच्या नेत्या माजी केंद्रीय मंत्री डॉ. गिरिजा व्यास यांच्या बाबतीत विचित्र अपघात घडला आहे. त्या घरातच पूजा करताना भाजून गंभीर जखमी झाल्या आहेत. त्या नियमितपणे पूजा करत असताना पणतीच्या ज्योतीने त्यांच्या ओढणीने अचानक पेट घेतल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना आधी उदयपूर येथील अमेरिकन रुग्णालयात दाखल केले होते. त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी अहमदाबादला घेऊन गेले आहेत.

माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेसच्या नेत्या डॉ. गिरिजा व्यास घरातच भाजल्या गेल्या आहेत.त्या नेहमी प्रमाणे पूजा करीत होत्या. त्यावेळी त्यांच्या ओढणीने पेट घेतला आणि त्या गंभीररित्या भाजल्या गेल्या. गणगौरच्या पूजे दरम्यान ही घटना घडली आहे.




**जामनेर ।** सोमवारी रमजान ईदनिमित्त जामनेर शहरातील ईदगाह मैदानावर मुस्लीमबांधवांना शुभेच्छा देताना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व भाजपाचे कार्यकर्ते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी गृहखाते सोडावे!



**मुंबई ।** महायुतीच्या सरकारच्या काळात राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून बीड जिल्ह्यात कायदा शिल्लक नाही. बीडच्या रस्त्यावर सुरु असलेले टोळीयुद्ध आता तुरुंगात पोहोचले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहखात्याचा मोह सोडून राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन पान २ वर »

## कंत्राटदारांच्या तोंडाला पाने पुसली

### शेवटच्या दिवशी कोट्यवधी रुपयांचा निधी वितरित



**मुंबई ।** सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या सोमवारच्या शेवटच्या दिवशी काही तासात तब्बल १८३ शासन निर्णय जारी करून कोट्यवधी रुपयांचा निधी आणि अनुदान वितरित करण्यात आले. मात्र, हा निधी वितरीत करताना शासन मान्य कंत्राटदारांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. कंत्राटदारांच्या ५४ हजार कोटी रुपयांच्या थकित बिलापैकी फक्त ७४२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. त्यामुळे कंत्राटदार संतप्त झाले असून त्यांनी राज्यातील विकासकामे ठप्प करण्याचा इशारा दिला आहे.

३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या आजच्या शेवटच्या दिवशी मंत्रालयातील सर्व विभागांमध्ये लगबग दिसून आली. मध्यरात्री उशीरापर्यंत सर्व विभागातील अधिकारी व्यस्त होते. आर्थिक पान २ वर »

केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1950 |
| नवती (२) | : 1750 |






## धुळ्यात जुन्या पुठ्ठ्याच्या गोडाऊनला भीषण आग

**धुळे ।** शहरातील ८० फूट रस्त्यावर नटराज टॉकीजच्या बाजूला असलेल्या जुन्या पुठ्ठ्यांच्या गोडाऊनला आज सायंकाळी भीषण आग लागली. हे गोडाऊन अन्वर अन्सारी यांचे असून, घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी धाव घेतली आणि शक्य तेवढे पुठ्ठे बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

आगीची माहिती मिळताच धुळे मनपाच्या अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. पाच फेऱ्यांमध्ये पाण्याचा मारा करत त्यांनी शर्तीचे प्रयत्न करुन आग आटोक्यात आणली. मात्र, या आगीत गोडाऊनमधील माल जळून पान २ वर »

## शिक्षण व्यवस्थेची हत्या थांबवा!

### सोनिया गांधींचे मोदी सरकारला पत्र



**नवी दिल्ली ।** काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी देशातील शिक्षण व्यवस्थेच्या स्थितीवरून केंद्र सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला आहे. त्या म्हणाल्या, गेल्या दशकभरात केंद्र सरकारने इथल्या शिक्षण व्यवस्थेत केवळ स्वतःचा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतःच्या फायद्यासाठी शैक्षणिक संस्थांचे खासगीकरण केले आणि लोकांवर खासगी शिक्षण संस्था लादल्या.

सोनिया गांधी म्हणाल्या, भाजपा शिक्षण व्यवस्थेचे नुकसान करत आहेत. केंद्रीकरण, व्यापारीकरण आणि सांप्रदायिकीकरण या तीन सी मुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. या सरकारने गेल्या वर्षभरापासून शिक्षण मंडळाची बैठक बोलावलेली नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी संबंधित मोठ्या बदलांबाबत केंद्र सरकारने राज्य सरकारांशी एकदाही चर्चा केलेली नाही. राज्य सरकारांवर दबाव आणणे, केंद्र सरकारचा निधी रोखणे ही सरकारसाठी शरमेची बाब आहे.

यूजीसीच्या नियमांचा नवीन मसुदा अलीकडेच सादर केला आहे. त्यामध्ये राज्य सरकारच्या विद्यापीठांमधील कुलगुरूंच्या नियुक्ती प्रक्रियेतून राज्य सरकारे वगळण्यात आली आहेत. यासंदर्भात राज्यपालांमार्फत थेट केंद्र सरकारला अधिकार देण्यात आले आहेत. मोदी सरकारचे हे प्रताप संघराज्यासाठी धोकादायक आहेत. या लोकांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेची हत्या थांबवली पाहिजे, असंही सोनिया गांधी म्हणाल्या.








श्री गजानन महाराज संस्थान,शेगांव जि. बुलढाणा

(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)

१३१ वा श्रीरामनवमी उत्सव

दरवर्षी प्रमाणे यावर्षी १३१ वा श्रीरामजन्मोत्सव दि. ३०/०३/२०२५ ते दि. ०६/०४/२०२५ पावेतो परंपरेनुसार कार्यक्रम होऊन संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे, ही विनंती.

श्री मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधि दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था केलेली आहे.

शेगांवी आलेवर निवास व्यवस्थेकरीता भक्तनिवास संकुल, विहार भक्तनिवास संकुल, विसावा भक्तनिवास संकुल येथे चौकशी करावी.

भक्तांनी भक्तनिवासामध्ये निवास व्यवस्था घेतेवेळी श्री संस्थानच्या नियमाप्रमाणे कोणतेही शासकीय एक / दोन ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

व्यवस्थापकीय विश्वस्त,